# शैक्षणिक ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग

**डॉ.रंजना भानुदास व्यवहारे**
विमेन्स् कॉलेज ऑफ ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स,
न्यु नंदनवन, नागपुर
E.Mail : taywadev@gmail.com

**सार :—**

आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक ग्रंथालयांना महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. कारण त्यांना करावयाचे कार्य व्यवस्थित पार पाडतांना दिसून येतात. शैक्षणिक ग्रंथालयातून वाचकांना पाहिजे असलेले वाचनीय साहित्य पुरविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जातो. पण सद्याच्या तंत्रज्ञानाच्या काळात रोजच्या रोज नवीन माहितीची निर्मिती होतांना दिसून येते. अनेक विषयात नवनवीन संशोधन होवून प्रत्येक विषयात नविन माहिती उदयास येते. या उदयास येणाऱ्या नविन माहितीच्या परिस्फोटामुळे मानवाच्या ज्ञानात भर पडतच राहते. अशीही उदयास येणारी माहिती ही ग्रंथाच्या, नियतकालिकाच्या, तंत्रज्ञानाच्या स्वरूपात वाचकांना मिळते. आणि ती माहिती वाचकापर्यंत पोहचविण्याचे कार्य ग्रंथालय करीत असतात. पण ही जी नविन स्वरूपातील माहिती प्रसारीत होते ती माहिती प्रत्येकच ग्रंथालयाला खरेदी करणे शक्य होत नाही. कारण ग्रंथालयाचे असलेले अपुरे अनुदान आणि दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या कागदाच्या किंमती या कारणांमुळे प्रत्येक ग्रंथालयांना प्रकाशित होणारे सगळेच वाचणीय साहित्य खरेदी करणे शक्य होत नाही. प्रकाशित होणारे प्रत्येक वाचनीय साहित्य खरेदी तर करू शकत नाही व ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांच्या गरजा तर भागविल्या पाहिजे. याकरिता ग्रंथालयातील वाचनीय साहित्यांचा सामूहिक उपयोग ही संकल्पना उदयास आली. या संकल्पनेतून काही शैक्षणिक ग्रंथालय एकत्रीत येवून त्यांच्या सहकार्यातून आपल्या ग्रंथालयातील वाचन साहित्य सहकारी तत्वावर दुसऱ्या ग्रंथालयातील वाचकांना देणे व दुसऱ्या ग्रंथालयातील वाचन साहित्य आपल्या वाचकांना पाहिजे असल्यास त्यांना उपलब्ध करून देणे म्हणजेच ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग होय. यामूळे सहभागी प्रत्येक ग्रंथालयातील वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**प्रस्तावना :—**

प्रत्येक ग्रंथालयाकडे असणारा ग्रंथ संग्रह व इतर साहित्य हे एकमेकांनी सहकार्याने वापरणे यालाच वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग असे म्हणतात. या वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग केल्यामूळे ग्रंथालयातील वाचकांना चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रयत्न केला जावू शकतो. ग्रंथालयाच्या नेटवर्कमधून वाचन साहित्याचा उपयोग करण्यामागे काही कारणे सांगता येतील.

१) ग्रंथालयाकडे असलेला अपुरा निधी.
२) माहितीचा विस्फोट.
३) पुस्तकांच्या वाढत्या किंमती.
४) ग्रंथालयाची अपुरी जागा.
५) ग्रंथालयातील तंत्रज्ञानाचा वापर.

या सर्व कारणामूळे ग्रंथालयातील साहित्याचा सामूहिक उपयोग करणारी संकल्पना उदयास आल्याचे दिसून येत असून ग्रंथालयातील साहित्याचा सामूहिक उपयोग हा अनेक प्रकारांनी करता येवू शकतो.

१) एका ग्रंथालयाच्या वाचकाने दुसऱ्या ग्रंथालयात जाऊन त्या ग्रंथालयाचा वापर करणे.
२) त्यांना पाहिजे असलेली माहिती किंवा पुस्तके कोणत्या ग्रंथालयात आहेत ते संयुक्ततालिकेवरून शोधून ते उपयोगात आणणे.
३) ग्रंथालयातील इतर साहित्याची देवाण घेवाण करणे.
४) ग्रंथालयातील पुस्तके आणि नियतकालिकाव्यतिरिक्त इतर वस्तूची ही देवाण घेवाण करणे.
५)एका ग्रंथालयात पुस्तक मिळत नसल्यास संयुक्त तालिका बघून ज्या ग्रंथालयात ते पुस्तक उपलब्ध असेल तर प्रथम त्या ग्रंथालयाला फोन करून त्या ग्रंथाची प्रत राखीव ठेवण्यास सांगता येईल व नंतर प्रत्यक्षात जावून ती घेता येईल.

आधुनिक काळात ग्रंथालय ही संस्था समाजातील एक महत्वाची संस्था असल्याचे दिसून येते. समाजातील व्यक्तिच्या वाचनीय गरजा भागविण्याचे कार्य ग्रंथालय करतांना दिसून येते. आधीच्या काळापेक्षा आजच्या काळात ग्रंथालयाला मोलाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. समाजात अनेक प्रकारचे ग्रंथालय स्थापन झाल्याचे दिसून येते. जसे शैक्षणिक ग्रंथालय सार्वजनिक ग्रंथालये, संशोधनपर ग्रंथालय अशाप्रकारे विविध क्षेत्रात ग्रंथालय स्थापन झाल्याचे दिसून येते. प्रत्येकच क्षेत्रातील ग्रंथालय आपल्या परीने वाचकांना योग्य त्या सेवा देण्याचा प्रयत्न करतात. परंतु वाचकांच्या

वाचनीय गरजा पूर्ण करीत असतांना काही वेळेस मात्र अडचणी येतांना दिसून येतात. याचे कारण म्हणजे आधुनिक काळात प्रत्येक क्षेत्रात होणारा माहितीचा विस्फोट होय.

आजच्या काळात संशोधनाला जास्त महत्व देण्यात येत आहे. प्रत्येक विषयात रोजच्या रोज नविन संशोधन होवून त्यातून नवीन माहितीची निर्मिती होतांना दिसून येते. ही नविन माहिती त्या विषयात संशोधन करीत असणाऱ्यांना उपयोगाची असते. संशोधनकर्ता व्यक्ती जेव्हा ग्रंथालयात या नविन माहितीची मागणी करतो. तेव्हा त्याला ती माहिती त्या ग्रंथालयातून मिळत नाही व त्याला संशोधन करतांना अडचणी येते. व त्याचे संशोधन पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होतांना दिसून येतात. संशोधकांना संशोधन करतांना किंवा वाचकांना वाचनीय साहित्य मिळतांना होणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टिने एक संकल्पना उदयास आली आहे. ती म्हणजे ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग ग्रंथालयात असणाऱ्या साहित्याचा उपयोग हा ग्रंथालयाच्या वाचकांवर अवलंबून असतो. ग्रंथालयाचे वाचक त्यांना पाहिजे त्या साहित्याचा वाचनासाठी संशोधनासाठी उपयोग करतात. पण काही वेळेस त्यांना पाहिजे असलेले साहित्य मिळत नाही. अशा वेळेस ग्रंथालय नेटवर्कचा उपयोग करून दुसऱ्या ग्रंथालयातून वाचकांना पाहिजे असलेले साहित्य मागवून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या जाते. यालाच ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग असे म्हणतात. या सामूहिक उपयोगामूळे ग्रंथालय ग्रंथालयातील संबंध मजबूत होवून चांगल्या प्रकारे संबंध निर्माण होण्यास मदत होते.

**ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग :**

ग्रंथालय सहकार्य ही संकल्पना तशी जूनीच असल्याचे दिसून येते. नेटवर्कच्या माध्यमातून ग्रंथालय सहकार्य या गोष्टीला अमेरिकेत १९६० मध्येच सुरूवात झाल्याचे दिसून येते. आपल्या देशात ग्रंथालय सहकार्य तसे अजूनही मर्यादित स्वरूपाचे आहे. मात्र प्रगत राष्ट्रामध्ये वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग यशस्वीरित्या झाल्याचे दिसून येते. ग्रंथालयात ग्रंथालयातील माहितीची निवड करणे, तिचे मूल्यमापन करणे, व्यवस्थापन करणे, प्रसारित करणे आणि योग्य त्या वाचकापर्यंत ती माहिती पोहचविणे हे काम खरोखरच खूप जबाबदारीने करावे लागते. ग्रंथालयातून जी माहिती वाचकापर्यंत पोहचविल्या जाते. ती माहिती मिळून वाचक वर्ग संतुष्ट होणे खूप महत्वाचे असते. वाचकांना त्यांच्या उपयोगाची योग्य ती माहिती मिळाली नाही तर ते असंतुष्ट होवून परत जाणे ग्रंथालयाकरिता चांगले होत नाही.

ग्रंथालयातून मिळालेल्या माहितीने वाचक वर्ग संतुष्ट झाला पाहिजे व समाधान होवून बाहेर गेला पाहिजे. याकरिता आपल्या ग्रंथालयातून जर वाचकाची माहितीची गरज पूर्ण होवू शकत नसेल तर आंतरग्रंथालय सहकार्यातून दुसऱ्या ग्रंथालयात ती माहिती उपलब्ध असेल तर सहकार्य तत्वावर ती माहिती आपल्या वाचकांना उपलब्ध करून त्याची गरज पूर्ण करता येते.

ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग ही संकल्पनाच याकरिता उदयास आली आहे की ग्रंथालयातील संसाधनाचा सहकारी तत्वावर सामूहिक उपयोग झाला पाहिजे. सद्य:परिस्थितीत प्रत्येक शैक्षणिक ग्रंथालयाला सगळेच साहित्य खरेदी करणे जमत नाही. कारण ग्रंथालयाला मिळणारे तुटपुंज निधी, पुस्तकांच्या वाढलेल्या किंमती, नियतकालीकांच्या किंमती, तसेच अपूरे मानव संसाधन, नवीन तंत्रज्ञानाचा खर्च या सगळया समस्यांवर एक उपाय म्हणजे ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग यालाचा ग्रंथालय कोऑपरेशन, लायब्ररी नेटवर्किंग, लायब्ररी कोलॅबोरेशन, इटरलायब्ररी लोन, दस्तऐवज पुरवठा, दस्तऐवज वितरण इ. परस्पर संबंधी संज्ञा वापरल्याजातात.

वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग हे ग्रंथालयातील साधनसंपत्ती बघून वेगवेगळया प्रकारे करता येवू शकते.

**१) आंतरग्रंथालयातील देवाण—घेवाण :—**

आंतरग्रंथालयातील साधनाची देवाण—घेवाणही अनेक प्रकारे करता येते. यात पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परिक्षेची पुस्तके अशा अनेक साहित्याची देवाण घेवाण आंतरग्रंथालयाद्वारे करू शकतो. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकाला पाहिजे असलेले पुस्तके किंवा माहिती आपल्या ग्रंथालयात जर उपलब्ध नसेल तर त्या वाचकाची माहितीची गरज भागविण्यासाठी ज्या ग्रंथालयासोबत आपला आंतरग्रंथालयीन करार झालेला आहे. त्या ग्रंथालयात जर ती माहिती उपलब्ध असेल तर त्याच्याकडून घेवून आपल्या वाचकाची गरज याद्वारे भागविल्या जावू शकते. आपल्याला गरज असेल तेव्हा त्यांच्याकडील साहित्य आपल्याला मिळेल व त्यांना गरज असेल तेव्हा आपल्याकडील साहित्य त्यांना उपलब्ध करून द्यावे. जेणे करून वाचकांच्या अभ्यासकाची माहितीची गरज पूर्ण होवू शकेल. व ग्रंथालयाद्वारे ते संतुष्ट होवू शकतील.

**२) तालिकीकरण :—**

आंतरग्रंथालयीन नेटवर्कमध्ये जी काही ग्रंथालये सहभागी असतील त्यासर्वांची मिळून ग्रंथालयातील सर्व वाचन साहित्याची एक संघतालिका बनविली जाते. जेव्हा केव्हा कोणत्याही ग्रंथालयातील वाचकांना माहितीची गरज असते. तेव्हा या सामूहिक तालिकेचा उपयोग करून कोणत्या ग्रंथालयात ही माहिती उपलब्ध होवू शकते याची माहिती मिळते. त्यांना पाहिजे असलेली माहिती त्या ग्रंथालयातून मागवून आपली गरज पूर्ण करू शकतात.

**३) माहितीसेवा :—**

ग्रंथालयातील पुस्तके, नियतकालिके याची सामूहिक तालिका ग्रंथालयातील माहिती व डेटाबेस निर्मितीकरीता उपयुक्त ठरते. या सामुहिक तालिकेमुळे ग्रंथालयातील अनेक प्रकारचे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, यांचे डेटाबेस तयार करणे सुलभ होते. व त्याच्यात एकसारखेपणा दाखविता येतो. यामुळे ग्रंथालयातील वाचकांना पाहिजे असलेली माहिती देणे सहज सोपे होते.

**४) भाषांतरसेवा :—**

ग्रंथालयात येणारी माहिती अनेक विषयांवर उपलब्ध असते. अनेक विषयांवर दररोज नवीन लेख प्रकाशित होत असतात. यातील काही लेखांचे भाषांतर करून ठेवावे लागते. कारण येणारा वाचक कोणत्या भाषेतील माहितीची मागणी करेल याचा अंदाज करता येत नाही. या लेखांच्या भाषांतराला बराच खर्च लागतो. पण सामूहिक वाचन साहित्याचा उपयोग या नेटवर्क मध्ये जी ग्रंथालय समाविष्ट झालेली असतात. तिथे त्या लेखांसाठी पुन्हा पुन्हा भाषांतरित करण्यासाठी लागणारा खर्च वाचवू शकतो. सगळया ग्रंथालयांनी मिळून सर्व भाषांतरित लेखाची एक सामूहिक यादी तयार केल्यास सगळया ग्रंथालयात कोणकोणत्या लेखाचे भाषांतर झालेले आहे ते समजते. सगळयाच ग्रंथालयातील वाचकांना या वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगात लाभ घेता येतो.

**५) विशेष ग्रंथ संग्रह :—**

काही ग्रंथालये ही विशेष ग्रंथालय असतात. जसे की एखाद्या विशेष उद्येशाने स्थापन झालेले ग्रंथालय. ही ग्रंथालय स्थापन करण्याचा त्यांचा विशेष उद्देश असतो आणि ती उद्दिष्टये पूर्ण करण्याकरिता ती कार्यरत असतात. अशा प्रकारे विशेष उद्दिष्टये असणारी ग्रंथालय सामूहिक वाचन समूहात सहभागी झाल्यासत यांचा त्या—त्या विशिष्ट विषयातील ग्रंथ संग्रहास ग्रंथालयाला प्रोत्साहन दिले जाते व याचा उपयोग त्या—त्या ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना होवू शकतो.

ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामुहिक उपयोग हा अनेक प्रकारे केल्या जावू शकतो. ग्रंथालय ही ज्ञानाच्या साठयाने भरलेली असतात व वाचन वर्ग आपल्या ज्ञानाची भुक भागविण्यासाठी ग्रंथालयाचा उपयोग करतात. ग्रंथालयात येतात. शैक्षणिक ग्रंथालयात अभ्यासक्रमाची, मनोरंजनपर, जनरल नॉलेज, स्पर्धा परिक्षा, मासिक, जर्नल्स् अशा प्रकारे विविध स्वरूपात माहिती उपलब्ध असते. परंतू या प्रकारातही माहिती उपलब्ध असतांना प्रत्येकच बाबतीत माहिती मिळेल असे होत नाही. प्रकाशित होणारी सर्वच माहिती ग्रंथालयाला विकत घेणे शक्य होत नाही. प्रत्येक ग्रंथालय आपल्या बजेटनुसार, ग्रंथालयाला मिळालेल्या अनुदानानुसार पुस्तकांची, मासिकांची खरेदी करीत असतात. त्यात बरेचसे पुस्तके किंवा माहिती विकत घेण्याचे राहून जाते. तसेच मासिकाचेही आहे. बाजारात एवढया विषयांवर मासिक निघतात ती सर्वच ग्रंथालयांना घेणे शक्य होत नाही. अशावेळेस सामूहिक वाचन साहित्याचा उपयोग करून ग्रंथालयातील वाचन साहित्याची सहकारी तत्वावर अदलाबदली करून वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यास उपयोगी पडू शकते.

**वाचन साहित्याच्या सामूहिक उपयोगाचे स्तर :—**

वाचन साहित्याचे सामूहिक उपयोग याचे वेगवेगळे स्तर दिसून येतात.

**स्थानिक :—** स्थानिकमध्ये आपल्या शहरांमध्ये ती काही ग्रंथालये आहेत. त्यांनी मिळून किंवा आपले ग्रंथालये जिथे आहेत त्यांच्या आजूबाजूच्या ठिकाणाची ग्रंथालये मिळून एकत्रीत येवून आपल्या ग्रंथालयातील साहित्याची एक संघतालिका बनवून ती वाचकांना उपयोगाकरिता देणे. यामुळे ते याचा उपयोग करून आपली वाचनाची गरज पूर्ण करू शकतील.

**प्रादेशिक :—** यात शहरापेक्षा थोडया विस्तृत अशा भौगोलिकदृष्टया विस्तारीत झालेल्या शहरांनी मिळून ग्रंथालयातील साहित्याची संघतालिका बनवून नेटवर्कच्या साहायाने आंतरग्रंथालयीन साहित्याची देवाण—घेवाण करू शकतात.

**देशपातळीवर :—** स्थानिक, प्रादेशिक स्तरावर ज्या प्रकारे आंतरग्रंथालयीन देवघेवनुसार साहित्याचा सामूहिक उपयोग करू शकतो, त्याचप्रमाणे देशपातळीवर सुध्दा ग्रंथालयातील साहित्याचा सामूहिक उपयोगाचे नेटवर्क स्थापन करता येणे शक्य होवू शकते. राष्ट्रीय माहिती धोरणाअंतर्गत अश्याप्रकारच्या ग्रंथालयाचे नेटवर्क स्थापन करून वाचन साहित्याच्या सामूहिक उपयोगाचे साध्य करता येते.

**ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या सामूहिक उपयोगाचे साधन :—**

आंतरग्रंथालयीन साहित्याचा सामूहिक उपयोग करण्याकरिता सगळया ग्रंथालयातील साहित्याची सगळयाच ग्रंथपालांना माहिती असणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्रंथालयात असणारे ग्रंथ संग्रह आणि ग्रंथेत्तर इतर वाचनीय साहित्याची माहिती असायला पाहिजे. या वाचनीय साहित्याची माहिती पूर्णपणे मिळविण्यासाठी सर्व ग्रंथालयातील साहित्याची संघतालिका हे एक साधन होवू शकते. संघतालिका जर तयार केल्या तर सगळयाच साहित्याचा उपयोग करणे सोपे होते. परंतू या सगळया साहित्याची संघतालिका तयार करणे व अद्यावत ठेवणे फार कठिण काम होते. परंतु आधुनिक काळात संगणकाच्या साहाय्याने या संघतालिका तयार करणे सोपे झालेले आहे. अशाप्रकारे संघतालिका तयार करून वाचकांना ग्रंथालयातील पुस्तके, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, मासिक, सभा, चर्चासत्रे, सी.डी, रॉम, डेटाबेस याचेही संघतालिका बनवून ते वाचन साहित्याच्या सामूहिक उपयोगासाठी साधन म्हणून वापरता येतात.

**वाचन साहित्याचा एकत्रित उपयोग आणि माहिती तंत्रज्ञान—**

ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग करून वाचकांच्या गरजा भागविणे ही ग्रंथालयातील महत्वाची सेवा म्हटले पाहिजे.कारण आंतरग्रंथालयीन वाचन साहित्याचा उपयोग करतांना ग्रंथालयांना मिळून जे कार्य करावे लागत होते ते फार कठिण आणि किचकट होते. सगळया ग्रंथालयाच्या मिळून संघतालिका बनवणे आणि ती अद्यावत ठेवणे तसे जिकरीचे काम होते. परंतु आता ग्रंथालयाच्या कामात संगणकाचा वापर आल्यामुळे हे काम करणे सोपे झाले आहे. आता ग्रंथालयाच्या नेटवर्क मधील संघतालिका संगणकाच्या साहायाने नेहमीच अद्यावत व ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध होवू शकते. संघतालिकाद्वारे हवे असणारे वाचन साहित्य कोणत्या ग्रंथालयात मिळू शकेल किंवा उपलब्ध आहे हे समजते. ते वाचन साहित्य ज्या ग्रंथालयात आहे. त्या ग्रंथालयातून इ—मेलद्वारा ती माहिती मिळवू शकतो. तसेच माहिती मशीनरी टेबल स्वरूपात असेल तर एक ग्रंथालयाच्या संगणकाला असणारी माहिती दुसऱ्या ग्रंथालयाच्या संगणकाकडे पाठविता येते व त्याची छापील प्रतही उपलब्ध करता येते. हे सर्व करीत असतांना थोडा खर्च जास्त येतो व त्याची फी आकारल्या जाते.

ग्रंथालयात आधुनिक काळात संगणकाचा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामूळे ग्रंथालयाची दैनंदिन कामे करणे सोपे झालेले आहे. ग्रंथालयातून सेवा देतांनाही संगणकाच्या वापरामूळे एखाद्या ग्रंथाची मागणी आल्यास तो ग्रंथालयात आहे किंवा नाही, नाही तर मग कोणत्या वाचकाकडे आहे हे सहजपणे समजू शकते. त्याचप्रकारे ग्रंथालय नेटवर्कमध्ये सुध्दा माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग झाल्यामुळे वाचन साहित्याच्या सामूहिक उपयोगामध्ये सहजपणे माहिती मिळण्यास मदत होते. महत्वाचे म्हणजे यात वेळेवर माहिती मिळाल्यामूळे उपयोगकर्ताचा वेळ वाचल्या जातो.

**वाचन साहित्याच्या एकत्रित उपयोगाचे फायदे—**

ग्रंथालयाच्या नेटवर्कच्या मदतीने ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग करण्याचे काही फायदे आपण बघू शकतो.

१) एकाच विषयांवर सर्व प्रकाशित साहित्य किंवा पुस्तके कोणतेही एक ग्रंथालय खरेदी करू शकत नाही. तेव्हा वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगाचा फायदा होतो.

२) दिवसेंदिवस पुस्तकांच्या, नियतकालिकांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झालेली दिसून येते. त्यामानाने ग्रंथालयांना मिळणारा अनुदान हे पुरेसे राहत नाही व प्रकाशित सर्वच साहित्य यामूळे प्रत्येक ग्रंथालय खरेदी करू शकत नाही. तेव्हा वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगाचा उपयोग उपभोक्त्यांना होवू शकतो.

३) प्रकाशित होणारे सर्वच साहित्य ग्रंथालय विकत घेवू शकत नाही. जी आवश्यक पुस्तके आहेत ती ग्रंथालयांना दरवर्षी घ्यावी लागतात आणि त्यासाठी लागणारी जागाही दरवर्षी व्यापत जाते. म्हणून प्रकाशित सर्व साहित्य ग्रंथालयाला घेणे शक्य होत नाही. अशावेळेस वाचकांना वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगावर अवलंबून राहावे लागते.

४) ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यामूळे ग्रंथालयातून माहितीची देवाण घेवाण ही जलदगतीने होवू लागली आहे. यामूळे वाचकांचा वेळ वाचतो व संशोधकांना त्यांच्या संशोधन कामात जलदता आल्याचे दिसून येते. यामूळे संशोधनास चालना मिळण्याचे काम होते.

५) सहकारी तत्वावर वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगामूळे प्रत्येक ग्रंथालयातील खरेदी बाबतची बचत होते. व बचत झालेला निधी दुसऱ्या महत्वाच्या कामात उपयोगात परिणामकारक उपयोगात आणता येतो.

अशाप्रकारे वाचन साहित्याचा सामूहिक उपयोगाचे अनेक फायदे असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :—**

आजच्या काळात ग्रंथाच्या वाढत जाणाऱ्या किंमती भरमसाठ प्रमाणात असल्याने प्रत्येक ग्रंथालयाला प्रकाशित सर्वच साहित्य आपल्या ग्रंथालयासाठी विकत घेता येत नाही. आणि त्याचमुळे वाचकांच्या येणाऱ्या प्रत्येक मागणीला ग्रंथालयाला माहितीचा पूरवठा करणे शक्य होत नाही. या समस्यावर उपयोग म्हणून ग्रंथालयाचे नेटवर्क स्थापन करून ग्रंथालयातील वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग करणे महत्वाचे ठरते. ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग हे वाचकांसाठी आणि ग्रंथालयासाठी दोघांसाठीही फायद्याचे असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :—**

१. फडके, द.ना. :—ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे
२. पवार, एस.पी. :—ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
३. https://digitalcommon.unl.edu
४. https://www.lisedunetwork.com
५. http://epgp.inflibnet.as.in